भविष्यातील यशाचा अंदाज घ्यायचा असेल, तर ते घडवण्याचा मार्ग स्वतः तयार करा.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार २ एप्रिल २०२५ | अंक १११ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






# खोक्या प्रकरणात व्हिलन ठरवून माझ्या हत्येचा कट

## - सुरेश धस यांचा गंभीर आरोप

### धसांच्या गौप्यस्फोटाने खळबळ

**खोक्या उर्फ सतीश भोसले याला काही दिवसांपूर्वी अटक करण्यात आली होती, त्याच्यावर अनेक आरोप झाले होते, त्याच्यावर शिकारीचा देखील आरोप लावण्यात आला होता. आणि जे मटण होतं, ते सुरेश धस यांना दिलं जात होतं, असाही आरोप झाला होता. आणि त्याच पार्श्वभूमीवर सुरेश धस यांनी एका पोर्टलला दिलेल्या मुलाखतीत एक गौप्यस्फोट केला आहे. मला जिवंत मारण्याचा कट रचण्यात आला होता. बिश्नोई गँगला देखील पाचारण करण्यात आलं होतं, असं धसांनी म्हटलं असून त्यांच्या या गौप्यस्फोटांमुळे आणि गंभीर आरोपांमुळे चांगलीच खळबळ माजलेली आहे. या कटामध्ये आणखी कोणी सामील आहे का, सुरेश धसांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या जीवाला धोका आहे, तर त्यासंदर्भात त्यांनी गृहविभागाला काही पत्र लिहीलं आहे का किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी त्यांनी या संदर्भात काही बातचीत केली आहे का ? याबद्दल अद्याप कोणतीही सविस्तर माहिती मिळू शकलेली नाही. सुरेश धसांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र तो संपर्क होऊ शकलेला नाही.**



खोक्या भोसले प्रकरणात व्हिलन ठरवून माझ्या खुनाचा कट रचण्यात आला होता, असा गंभीर आरोप सुरेश धस यांनी केला आहे.एका पोर्टलला दिलेल्या मुलाखतीमध्ये भारतीय जनता पक्षाचे आमदार सुरेश धस यांनी हे आरोप केले आहेत. राजस्थानातून बिश्नोई समाजाची काही लोकं मुंबईत आणली गेली. धसांना हरणाचं मांस कसं पुरवलं असं त्या लोकांना सांगितलं,बिश्नोई समाजामध्ये मला व्हिलन ठरवायचं होतं असा गंभीर आरोप धस यांनी केला. त्यांच्या या आरोपामुळे मोठी खळबळ माजली आहे. खोक्या भोसलेचं प्रकरण गेल्या काही दिवसांपासून गाजत होतं. खोक्या भोसलेने हरणांची शिकारसुद्धा केल्याचा मुद्दा चर्चेत आला होता. त्या माध्यमातून खोक्या भोसले हा सुरेश धस यांना हरणांचं मांस पुरवत होता, असे आरोपही काही लोकांनी केले होते. याच आरोपाच्या मुद्यावर बोलताना आता धस यांनी एका मुलाखतीत हा आरोप केला आहे. बिश्नोई गँगला मुंबईत आणलं गेलं आणि माझ्या खुनाचा डाव, कट रचण्याचा प्रयत्न झाला असा धक्कादायक खुलासा धस यांनी एका खासगी पोर्टलला दिलेल्या मुलाखतीत केला. ही अतिशय धक्कादायक आणि गंभीर बाब म्हणावी लागेल, कारण खोक्या भोसलेचं प्रकरण संपूर्ण महाराष्ट्रात गाजलं होतं. खोक्या भोसले हा बराच काळ फरारही होता. नंतर त्याला अटकही झाली, त्याचं घरही पाडण्यात आलं होतं. त्याच्या घरात वन्यप्राण्याचं वाळलेलं मांस सापडल्याचा मुद्दाही समोर आला होता. आणि त्याचाच आधार धरून खोक्या भोसले हा सुरेश धस यांना हरणांचं मांस पुरवत होता अशा स्वरुपाचा गंभीर आरोप करण्यात आला होता.

## फास्ट ट्रॅक कोर्टात केस चालवून संतोष देशमुख प्रकरणातील सगळ्यांना फाशी देऊन टाका, नाहीतर जेलमध्येच गँगवॉर होऊन सगळे संपतील-मनोज जरांगे

जालना। प्रतिनिधी बीडच्या कारागृहात वाल्मिक कराड आणि बबन गित्ते गँगचा महादेव गिते एकमेकांना भिडल्याचे समोर आले. काल सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास गिते आणि कराड समर्थक यांच्यात जोरदार राडा झाला. मात्र नेमकी कुणी कुणाला मारलं याबाबत अजूनही सस्पेन्स कायम आहे. कारण महादेव गितेनं वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुलेला मारहाण केल्याचा दावा भाजप आमदार सुरेश धस यांनी केला. तर दुसरीकडे वाल्मिक कराडनेच मारहाण केल्याचा दावा महादेव गिते केला आहे. तर कारागृह प्रशासनानं महादेव गित्तेचा बीड कारागृहातील मुक्कामच हलवला आहे. त्याला आता छत्रपती संभाजीनगरमधील हर्सूल येथील कारागृहात हलवण्यात आले आहे. आता या प्रकरणावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मोठं वक्तव्य केलंय. संतोष देशमुख प्रकरणाचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून सगळ्यांना फाशी देऊन टाका, नाहीतर जेलमध्येच गँगवॉर होऊन सगळे संपतील, असे त्यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, गँगवॉर होऊन हे एकमेकांना आतमध्ये संपवतील. आरोपी पळवाटा शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. हा खटला फास्ट ट्रॅकवर चालवून लवकरात लवकर आरोपींना फाशी द्या. म्हणजे ते एकमेकांना संपवणार नाहीत. जिल्हा प्रशासनातील सर्वांची बदली करून तिथे नवीन स्टाफ भरायला पाहिजे. त्यांची पण चौकशी झाली

## राज्यात ई-बाईक धोरण, पुणे-छत्रपती संभाजीनगर हायवेवर टोल

मु ंबई दि.१ (प्रतिनिधी): राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाची बैठक आज संपन्न झाली, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून ई बाईक संदर्भात काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. महाराष्ट्रात ई-बाईक धोरण स्वीकारला जाईल, राज्यात लवकरच बाईक टॅक्सी सुरू होईल, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी बैठकीनंतर दिली. महिला सुरक्षेच्या दृष्टीने काही नियमावली बनवली जात आहे. तसेच, प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने काही उपाययोजना केल्या जातील, असेही सरनाईक यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारकडून ई-बाईकचा पर्याय आणला जात आहे. या ई-बाईकच्या दरांबाबत अद्याप निश्चित झालेलं नाही. दरम्यान, रिक्षा आणि टॅक्सी चालकांना १० हजार रुपयांचे अनुदान द्यायचा प्रयत्न शासन करत आहे. त्यामुळेच, १० हजारांहून अधिक रोजगार मुंबईतच निर्मिती होणार आहेत, याशिवाय पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे, अशी माहितीही परिवहन मंत्र्यांनी दिली.

## शिरूर,गेवराई तालुक्याला ना.पंकजा मुंडे यांनी दिलं विकासाचं गिफ्ट!

बीड दि.१ (प्रतिनिधी) राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मु ंडे यांनी आज शिरूर कासार आणि गेवराई तालुक्याला विकासाचं गिफ्ट दिलं आहे. शिरूर तालुक्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव कोल्हापूरी बंधाऱ्याच्या विस्तारासाठी २२ कोटी तर ब्रह्मनाथ येळंब व टाकळगाव हिंगणी (गेवराई) येथील बंधाऱ्यासाठी ३७ कोटी रूपये निधीला राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या उपस्थितीत पार पडली. ना. पंकजाताई मु ंडे यांच्यामुळे या बैठकीत बीड जिल्ह्याला विकासाचं गिफ्ट मिळालं. जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव (ता. शिरूर, जि. बीड) कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी २२.०८ कोटी रुपये, सिंदफणा नदीवरील ब्रम्हनाथ येळंब (ता. शिरूर, जि. बीड) कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी १७.३० कोटी रुपये आणि सिंदफणा नदीवरील टाकळगाव (हिंगणी) (ता. गेवराई, जि. बीड) कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधा रणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी १९.६६ कोटी रुपये अशा तीन कामांना बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. जिल्ह्यात पाऊल ठेवण्यापूर्वीच निधी आणला ना. पंकजाताई मु ंडे उद्या २ एप्रिल रोजी बीड जिल्हयात येत आहेत. आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांनी जिल्हयात पाऊल ठेवण्यापूर्वीच हा निधी मंजूर करून घेतल्याने शेतकऱ्यांसह जिल्हावासियांनी आनंद व्यक्त केला आहे.



## अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस मार्च 2025 अखेर ६ कोटी ६२ लक्ष रुपयाचा करपूर्व नफा

अंबाजोगाई दि.१ (प्रतिनिधी ):- अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेने सन २०२४-२०२५ मधील केलेल्या उत्तम कामकाजामुळे ३१ मार्च २०२५ अखेर बँकेने ५७३ कोटींच्या ठेवी जमा करत वर्षाखेरीस ०% नेट एन पी ए राखण्यात यश मिळवले आहे. त्याबरोबरच मार्च २०२५ अखेरीस बँकेस ६ कोटी ६२ लक्ष एवढा करपूर्व नफा मिळवल्याचे बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. बँकेने मिळवलेले हे यश बँकेचे सर्व सन्माननीय संचालक, ठेवीदार, ग्राहक तसेच सभासदाच्या विश्वास व सहकार्याच्या भावणेमुळेच शक्य झाले असल्याचे देखील या पत्रकात नमूद केले आहे.




केज दि.१ (प्रतिनिधी) : चित्रपट सृष्टीतील सिने अभिनेते सयाजी शिंदे यांनी मंगळवारी मस्साजोग येथील देशमुख कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन करुन त्यांना धीर दिला. सिने अभिनेते सयाजी शिंदे हे मस्सा जोग येथे मंगळवारी (दि. १ ) सकाळी ११ वाजता आले. प्रथमता त्यांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या आई सह देशमुख कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे त्यांनी सांत्वन करुन त्यांना धीर दिला. त्यानंतर सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांच्याशी त्यांनी संवाद साधला

# अजित पवार यांच्या विशेष उपस्थितीत ईद मिलाप कार्यक्रम मोठ्या संख्येने उपस्थित रहा - सय्यद फारुक अली पटेल



बीड - नगर परिषद चे माजी उपनगराध्यक्ष, गटनेते तथा ज्येष्ठ नगरसेवक सय्यद फारूक अली पटेल यांनी रमज़ान ईद निमित्ताने उद्या दिनांक ०२ एप्रिल २०२५ रोजी ईद मिलाप कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमास राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. मुस्लिम बांधवांसह सर्वधर्मीय बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. रमज़ान ईद निमित्ताने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सर्वधर्मीय बांधवांसाठी दिनांक ०२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजेपासून ईद मिलाप कार्यक्रमाचे आयोजन सय्यद फारुक अली पटेल मित्र परिवार बीडकडून करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यावेळीही हा कार्यक्रम फारुख पटेल याच्या निवासस्थानासमोर, मुहम्मद अली रोड, शहिंशाह नगर, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. यांना कार्यक्रमात मुस्लिम बांधवांसह सर्वधर्मीय बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### या मान्यवरांचीही राहणार प्रमुख उपस्थिती



धनंजय मुंडे (मा. मंत्री तथा आमदार परळी वै.), अमरसिंह पंडित (सचिव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महा.राज्य), आमदार विजयसिंह पंडित, सलिम सारंग (राष्ट्रीय अध्यक्ष मुस्लिम वेल्फेअर), कल्याण आखाड़े (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेशाध्यक्ष ओ.बी.सी. सेल), डॉ. योगेश क्षीरसागर (बीड विधानसभा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी), राजेश्वर चव्हाण (जिह्लाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी), अमर नाईकवाडे ( माजी नगरसेवक, बीड), मोईनुद्दीन मास्टर (माजी उपनगराध्यक्ष, बीड), अविनाश नाईकवाडे (जिह्ला उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी), शेख तय्यब भाई (मौलाना आजाद महामंडळ संचालक), बळीराम गवते (पंचायत समिति सभापती), अश्फाक इनामदार (माजी नगरसेवक), शेख इकबाल (जिह्लाध्यक्ष अल्पसंख्यांक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी), शेख अलीम पटेल (जिह्लाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, असंघटीत कामगार विभाग).

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राहणार विशेष उपस्थिती

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांची सुद्धा या कार्यक्रमात विशेष उपस्थिती राहणार आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### कौतुकास्पद उपक्रम!

काल काल बीड शहरात एक अत्यंत चांगला कौतुकास्पद अशा उपक्रम सुरू झाला तशा तो मागच्या अनेक काळापासून बंद पडला होता म्हणजे पूर्वी तो सुरू होता पण तो बंद पाडला किंबहुना अधिकच स्पष्ट बोलायचं तर जाणीवपूर्वक बंद पाडला होता त्याच्या कारणाची आपण चर्चा करू पण बीड येथील माहेश्वरी समाजाच्या मित्रांनी एसटी स्टँड मध्ये पाणपोई सुरू करण्यात आली त्याचा शुभारंभ काल झाला या ठिकाणी केवळ पानपोळी सुरू झाली असे नाही तर पाणी पिणाऱ्याला व्यवस्थित बसून पाणी पिता यावं यासाठी बसण्यासाठी अत्यंत चांगली अशी व्यवस्था केलेली आहे हे विशेष तसं माहेश्वरी समाज जैन संघटना रोटरी लाईन सारख्या खाजगी संस्था प्रत्येक उन्हाळ्यात एसटी स्टँड सारख्या जिथे लोकांची येजा असते अशा ठिकाणी पाणपोई सुरू करत असायचे अशा उपक्रमाचा शेवट झाला कधी तर एसटी स्टँड सारख्या ठिकाणी अत्यंत थोड्या वेळासाठी आलेली बाहेर जाणारी वाहन थांबलेली असतात लोक उचलून पाणी पिऊ शकत नाहीत त्यांना पाण्याची गरज असते यासाठी बाटलीबंद पाण्याची विक्री करण्याची पद्धत पद्धत म्हणण्यापेक्षा एक व्यवसाय धंदा सुरू झाला आणि खरं म्हणा खोटं म्हणा पण कधीकाळी स्वतः एसटी महामंडळ पाणपोई सुरू करायचे तो उपक्रमच एसटीने बंद केला याचं कारण कदाचित पाण्याच्या बाटल्या विकणाऱ्याशी काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचे संगणक असू शकेल त्याबद्दल खात्रीने सांगता येणार नाही किंवा आरोप करता येणार नाही कारण वस्तुस्थिती मात्र हे आहे की पाणीपुरी हा प्रकार एसटी स्टँड मधून बंद झाला एसटी स्टँडवर कधीकाळी एसटी स्टँड बांधताना पिण्यासाठी म्हणून एका टाकीचे बांधकाम होत असायचे अशी टाकी होती तसेच जैन संघटनेने बांधलेली पाण्याची टाकी ही होती मात्र या दोन्ही टाकीमध्ये पाणी भरणे हे बंद केलं आणि कारण आपण सांगू शकत नाही त्यामुळे पाण्यासाठी लोकांच्या पुढे बाटलीबंद पाणी घेण्याच्या पलीकडे काही पर्याय नसायचा माहेश्वरी समाजातील तरुणांच्या लक्षात ही अडचण आली प्रवाशांना पाण्यासाठी होणारा त्रास लक्षात आला आणि त्यातून पानपोळीची कल्पना मूर्त स्वरूपात आणली खरोखरच या मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आणि त्यांच्या या उपक्रमासाठी सर्वतोपरी मदत करणाऱ्या सहकाऱ्यांचे आम्ही मनःपूर्वक कौतुक करतोस या उपक्रमाचे स्वागत करतो आणि यात्रेचा उपक्रम सुरू करण्यात यावा कारण प्रत्येकच एसटी स्टँडवर प्रवाशांना पाण्यासाठी त्रास होतच असतो उन्हाळ्यामुळे तहान लागणे हे नैसर्गिक आहे आणि नैसर्गिक पाणी तरी या प्रवाशांना देण्याची जबाबदारी महामंडळ पार पाडू शकत नसेल तर त्यासाठी सार्वजनिक क्षेत्रात काम करण्याची इच्छा असलेल्यांनी पुढे यायलाच पाहिजे सर्वच गोष्टी सरकारने केल्या पाहिजेत असं म्हणून काही होणार नाही कारण सरकारी योजनेत काम होण्यासोबतच भ्रष्टाचारी होतो पण स्वयंसेवी संस्थांच्या उपक्रमात प्रत्येक जणाच सेवा आणि सोय या ध्येयाने प्रेरित होऊन काम करत असल्यामुळे असे उपक्रम व्यवस्थित चालतात आपण सेवा करतो याची जाणीव असल्यामुळे या ठिकाणी पाणपोईवर काम करणारी माणसं सुद्धा सेवेच्या भावनेतूनच काम करतात उपकार करत असल्याचे भावना नसते त्यामुळे समोरच्या माणसास पाणी देताना आपण पुण्य विकत घेत आहोत हीच भावना त्या ठिकाणी काम करणारे असते आणि अशा भावनेने काम करणाऱ्या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतो !

# करणार काय? सांगणार कुणाला?

दिनांक ०२ मार्च २०२५ पासून इस्लाम धर्मातील सर्वात पवित्र महिना रमज़ान सुरू झाला होता. आणि दिनांक ३० मार्च २०२५ रोजी मग़रीब नमाज़ नंतर थोड्यावेळाने चंद्र दिसल्याचे जाहीर झाल्यानंतर दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी रमज़ान ईद मुस्लिम बांधव स्वधर्मीयांसह इतर सर्व जाती धर्मातील बंधू-भगिनींसोबत मिळून साजरी केली.

परंतु तत्पूर्वी रमज़ान ईद ची ओळख असलेले शीरखुर्मा हे खाद्य पेय बनविण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेले दूध लागते ते घेण्यासाठी मुस्लिम बंधू-भगिनी जेव्हा बाजारात आले तेव्हा ठीकठिकाणी आपापले मोठमोठे टँकर्स घेऊन दूध विक्रेते दूध विकत होते.

काही वर्षांपूर्वी शासन चालवीत असलेल्या शासकीय दूध डेअऱ्यांमधून दुधाचे टँकर यायचे. त्या दुधाचे दरही सर्वसामान्य गोरगरिबांना परवडेल आणि दैनंदिन जीवन जगत असताना मिळणाऱ्या दुधाच्या दरापेक्षा त्या दुधाचे दर हमखास कमी असायचे. परंतु शासन-प्रशासनाच्या अनास्थेमुळे तसेच योग्य नियोजनाच्या अभावामुळे शासकीय दूध डेअऱ्यांना टाळे लागले आणि मग तिथून सुरू झाल्या खाजगी व्यापाऱ्यांच्या दूध डेअऱ्या.

एरवी उच्चभ्रू, काही प्रमाणात मध्यमवर्गीय आणि चहाचा व्यवसाय करणारे हॉटेल चालक वगळता सर्वसामान्य गोरगरीब या खाजगी दूध डेअऱ्यांच्या दुधाकडे ढुंकणही पाहत नाही परंतु रमज़ान ईद साजरी करण्यासाठी शीरखुर्मा बनविण्याकरिता दुधाची मागणी वाढते आणि मागणीप्रमाणे दूध उत्पादक असलेल्या शेतकऱ्यांकडून चांगल्या प्रतीचे दूध हवे त्या प्रमाणात मिळत नसल्याने नाविलाजास्तव लोकांना या खाजगी दूध डेअऱ्यांच्या टँकर वाल्यांकडून दूध घ्यावे लागते.

कालही या खाजगी दूध डेअऱ्यांच्या टँकर वाल्यांकडून ठीकठिकाणी लाईनीत उभे राहून लोकांना दूध घ्यावे लागले.

खाजगी डेअऱ्यांवाले याला दूध म्हणत असल्याने घेणाऱ्यांनीही दूध म्हणून ते ६० साठ रुपये प्रति लिटर प्रमाणे विकत घेतले.

आता प्रश्न पडतो की, जेव्हा हे खाजगी दूध डेअऱ्यांवाले लोकांना ६० रुपये प्रति लिटर प्रमाणे जे दूध विकत होते ते खरेच हे शेतकऱ्यांकडून एवढ्या मोठ्या दराने विकत घेतात का? तर याचे उत्तर नाही असेच आहे.

शिवाय एवढ्या महाग दराने घेतलेले दूध कसे आहे तर त्याच्यात ना दुधाचा गंध, ना घट्टपणा, ना त्याच्यावर साय येण्याचा पत्ता, माप घेताना फक्त पाण्याचे बुडबुडे आलेले पाहून हे दूध कमी आणि पांढरे पाणी जास्त असा सगळा प्रकार होता.

या दुधापासून बनविण्यात येणारा शीरखुर्मा एवढा सपक बनतो की, त्याच्यात दुधाची चवच नसते. शीरखुर्मा तयार करताना या दुधात महाग मोलाचा सुकामेवा ज्यात काजू, बदाम, पिस्ता, अक्रोड,



चारोळी, खारीक, मनूके, खवा, गावरान तूप, खोबरे, साखर अशा अनेक वस्तू टाकून बनविला जातो.

दुधाच्या मानाने या सर्व वस्तूंची किंमत ही अनेक पटींनी जास्त असते. असे असूनही अनेक पट खर्च करून जो शीरखुर्मा बनविला जातो, त्यात मुळात सपक दूध म्हणजेच पांढरे पाणी असते. यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करून ही शीरखुर्मा बनविणाऱ्यांसह तो ग्रहण करणाऱ्यांनाही मानसिक आणि चवदार समाधान मिळत नाही. मात्र शीरखुर्मा बनविण्याची वर्षानुवर्षांपासून चालत आलेली रीत आणि ईद साजरा करण्याचा आनंद यामुळे मुस्लिम बांधवांना हे निकृष्ट आणि सपक दूध खरेदी करावेच लागते.

जर हे दूध घेतले नाही तर दूध दुभत्याचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांकडून सुद्धा दर्जेदार दूध मिळत नाही. यामुळे मुस्लिम बंधू-भगिनींनी खाजगी दुध डेअऱ्यांकडून आलेल्या टँकर वाल्यांकडून खरेदी केलेल्या सपक आणि बेचव दुधाला पाहून अनायासे मजबूरी का नाम महात्मा गांधी असेच म्हणावे लागते. परंतु हे सगळं सांगणार कुणाला? आणि करणार काय? असे प्रश्न निश्चितपणे या अनुषंगाने उपस्थित होतात. अन् ही अवस्था दिवसेंदिवस शासन प्रत्येक क्षेत्राचे करत असलेल्या खाजगीकरणामुळे होत आहे. याला शासकीय दूध डेअऱ्या बंद करून खाजगी दूध डेअऱ्या सुरू करण्याचे धोरणही अपवाद नाही.

**लेखन - एस.एम.युसुफ़ (मुक्त पत्रकार)**
**आसेफ़नगर, बीड**
**संपर्क - 9021 02 3121**

---

# महायुती सरकारने कर्जमाफी नाकारून बळीराजाशी दगाफटका केला
## शिवसेना जिल्हाप्रमुख - उल्हास गिराम

बीड :-( प्रतिनिधी ) लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवा मुळे महायुतीने विधानसभा निवडणुकी पूर्वी फसव्या आणि खोट्या घोषणांचा पूर आणला होता त्या पैकीच ऐक असणारी घोषणा म्हणजे शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन शेतमालाला योग्य हमी भाव देऊन त्यांना सुखाचे दिवस आणू असे आश्वासन देऊन सर्वसामान्य शेतकऱ्यांची मते पदरात पाडून घेतली पण सरकार आल्यावर सदरील घोषणेला महायुती सरकारने हरताळ फासला आहे शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे तर दूरच उलट त्यांना 31 मार्च पर्यंत कर्ज भरण्यासाठी दम दिला जात आहे.



राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी जाहीरपणे शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार नाही असे सांगितले त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही त्यांचीच भाषा बोलून कर्जमाफी कदापि ही होणार नाही असे सांगितले ज्या सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मतावर व जीवावर हे सरकार अस्तित्वात आले त्यांच्या सोबतच ह्या महायुती सरकारने दगा फटका करून त्यांना अजूनही आर्थिक अडचणीत आणण्याचे व शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम केले आहे. याउलट देशातील व राज्यातील उद्योगपतींना केंद्र व राज्य सरकार कडून न मागता हजारो कोटींची कर्जमाफी देण्यात आली असून हे सरकार सर्व सामान्य शेतकरी, जनतेचे नसून उद्योगपतींचे आहे अशा संकटाच्या काळात शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्ष शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर पणे उभे राहणार असून त्यांना कर्जमुक्ती मिळवून देण्यासाठी मोठे जनआंदोलन उभे करणार आहे असे प्रसिदीस दिलेल्या पत्रकात शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे जिह्लाप्रमुख उह्लास प्रकाशराव गिराम यांनी म्हटले आहे

---

# सलोखा बिघडविणाऱ्यांना चपराक, हिन्दू बांधवासाठी मस्जिदमध्ये ईद मिलाफ

पारगावातील मुस्लिम बांधवांचा आदर्श उपक्रम

पाटोदा / जावेद शेख

बीड जिह्ला विविध कारणाने धुमसत असून दोन दिवसापुर्वी जातीय तेड निर्माण करण्याच्या उद्देशाने मस्जिदमध्ये स्फोट घडवून आणल्याची घटना घडल्याने दोन समाजात जातीय तेड निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र मुस्लिम समाजाने शांतता प्रस्थापित करत कोणताही अनुचित प्रकार घडु नये व सलोखा अबाधित रहावा याची दक्षता घेतली.कारण रमजान महिन्याची शिकवणच शांतता,मानवतावाद असुन त्यात राग,द्वेष आदीला थारा नसल्याने मुस्लिम समाजाने शांततेच्या मार्गाचा अवलंब केला आहे.

त्यामध्येही एक पाऊल पुढे टाकत पाटोदा तालुक्यातील पारगाव घुमरा येथील मुस्लिम समाजातील सजक नागरिकांनी पुढाकार घेत रमजान ईद निमित्त सर्व जाती-पातीच्या भिंती पाडून एकत्रित ईद साजरी करत जातीयवाद करणाऱ्यांना चपराक लावली आहे. पाटोदा शहरापासून 6 किलोमीटर अंतरावर असलेल्या मौजे घुमरा पारगाव येथील ग्रामस्थ सर्वच सण उत्सव एकत्रित साजरा करतात मात्र यंदा बीड जिल्ह्यातील वातावरण पाहता रमजान ईद साजरी करताना काही मर्यादा येतील असे वाटत असताना गावातील मुस्लिम समाजातील जेष्ठ नागरिकांनी पुढाकार घेत ईद दिवशीच मस्जिद मध्येच ईद मिलाफ चा कार्यक्रम घेण्याचा निर्णय केला त्याला नवतरुणांनी पुर्ण पाठिंबा देत जोरदार तयारी केली त्यांना हिन्दू तरूणांनी ही स्वयंपाकात मतद करत व ईद मिलाफ कार्यक्रम यशस्वीरित्या पुर्ण करून दाखवत सलोख्याचे दर्शन घडवून आणले.



यावेळी सर्व समाजातील ग्रामस्थांनी शीरखुर्मा गोड गुलगुलेचा आस्वाद घेत एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या....

आरोपीसह वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्यांवरही कारवाई करा:-दिपक घुमरे

गेवराई तालुक्यात घडलेल्या घटनेची निंदा आरोपींना कठोर कारवाई करावी तसेच दोन समाजात जातीय तेड करण्याच्या उद्देशाने वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्यावर कारवाई करण्याची गरज आहे.आमचे गाव सलोखा जपणारा असुन आम्ही शांती अबाधित राखण्यासाठी कटिबद्ध राहुन सर्व सण उत्सव एकत्रित पणेच साजरे करतोत ग्रामस्थ :-दिपक(दादा) घुमरे

रहीमच्या उपक्रमात धनुष्य पेलणारा राम

घुमरा पारगाव येथील मुस्लिम समाजाने घेतलेल्या उपक्रमात हॉटेल व्यवसायीक राम घुमरे यांनी पदार्थ बनविण्यात पुढाकार घेतला होता तर त्यांच्या मदतीला अनेक हिन्दू बांधव राबतांना दिसून आल्याने रहीमच्या उपक्रमात धनुष्य पेलणारा राम म्हटलं तर वावगे ठरणार नाही

प्रथम घेण्यात आलेल्या उपक्रमाचं होत आहे कौतुक

पाटोदा तालुक्यात प्रथमच घेण्यात आलेल्या त्यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण भाग असलेल्या घुमरा पारगाव येथील मुस्लिम बांधवांनी सर्व समाज बांधवांसाठी एकत्रित मस्जिदमध्येच घेतलेल्या ईद मिलाफ उपक्रमांचा विविध माध्यमातून कौतुक होत आहे..

---

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम

बीड दि. 01 :- राज्याचे मा. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार उद्या दिनांक 2 एप्रिल 2025 रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे त्यांचा बीड जिह्ला दौरा पुढीलप्रमाणे आहे. बुधवार दि. 2 एप्रिल 2025 रोजी सकाळी 7.00 वाजता छत्रपती संभाजीनगर विमानतळ येथे आगमन. सकाळी 7.15 वाजता हेलिकॉप्टरने बीडकडे प्रयाण. सकाळी 7.55 वाजता पोलीस परेड ग्राऊंड येथील हेलीपॅड पोलीस मुख्यालय, बीड येथे आगमन. सकाळी 8.10 वाजता डॉ. योगेश क्षिरसागर यांच्या निवासस्थानी नगर रोड, बीड येथे आगमन. सकाळी 8.10 वाजता राखीव.

सकाळी 8.35 वाजता राष्ट्रवादी भवन कार्यालय, मित्र नगर, बीड येथे आगमन. सकाळी 8.35 वाजता पदाधिकारी कार्यकर्ते व अभ्यागतांच्या भेटीसाठी राखीव. सकाळी 9.45 वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे आगमन. सकाळी 9.45 वाजता राष्ट्रवादी युवक काँग्रेस मेळावा. नंतर सकाळी 10.50 वाजता सुराज्य नगर, बार्शी रोड, बीड येथे आगमन. सकाळी 10.50 वाजता प्रा. सुशिलाताई मोराळे यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट. नंतर सकाळी 11.15 वाजता खासबाग शासकीय रोप वाटीकेसमोर, शहिंशाह नगर, बीड येथे आगमन. सकाळी 11.15 राखीव .

सकाळी 11.45 वाजता जय हिंद सॉ-मिल सुभाष रोड योथे आगमन. सकाळी 11.45 वाजता राखीव. दुपारनंतर 12.45 वाजता श्री. अमरसिंह पंडित माजी आमदार यांच्या निवासस्थानी, शिवछत्र, सुभाषरोड बीड येथे आगमन. दुपारी 12.45 वाजता राखीव. दुपारी 1.55 वाजता जिह्लाधिकारी कार्यालय, बीड येथे आगमन. दुपारी 2.00 वाजता बीड जिल्ह्यातील विविध विकासकामे तथा योजनांची जिह्लास्तरीय आढावा बैठक.

सायं 4.00 वाजता जिह्लास्तरीय समितीची बैठक. सायं. 5.00 वाजता पत्रकार परिषद.

सायं. 5.45 वाजता ऑलिव्ह व्हेज रेस्टॉरंट, नगर रोड, बीड येथे आगमन व उद्घाटन. सायं. 6.10 वाजता लोकाशा भवन मोंढा रोड ,बीड येथे आगमन व दै. लोकाशा महोत्सव कार्यक्रम व 7.30 राखीव.

रात्री 8.15 वाजता मोटारीने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण

बीड/महाराष्ट्र विशेष वार्ता

दैनिक लोकआरंभ लोकक्रांतीचा आरंभ

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बुधवार २ एप्रिल २०२५

https://lokaarambh.com

३

# पालकांनी आपल्या मुलांना आता जि.प.शाळेतच पाठवावे-अशोक सोनटक्के

किल्ले धारूर दि.१ (वार्ताहर)शासनाने आता सर्वच प्राथमिक शाळेत सीबीएसई पॅटर्न लागु केल्याने पालकांनी आता आपल्या मुलांना खाजगी अथवा इंग्लिश स्कुलमध्ये ठेवण्याचा अट्टाहास न करता जि.प..शाळेत पाठवावे. असे आवाहन आदिश्री मिडियाचे महाराष्ट्राचे सर्वेसर्वा तथा सामाजिक युवानेतृत्व अशोक सोनटक्के यांनी केले आहे. यासंदर्भात आदिश्री मिडियाचे महाराष्ट्राचे सर्वेसर्वा तथा सामाजिक युवानेतृत्व अशोक सोनटक्के यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की,अगोदर इंग्लिश स्कुलमध्येच सीबीएसई पॅटर्न लागु होता.त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांचा जास्त ओढा इंग्लिश स्कुलकडे होता.त्यामुळे शासनाच्या जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत चालली होते.याचा फायदा इंग्लिश स्कुल चालक घेत. पालकांची आर्थिक लुट करत होते.हे पालकांच्या लक्षात येत असतानाही आपल्या मुलांच्या भवितव्याचा विचार करून पालक आर्थिक झळ सोसत होते.त्यातचआता शासनाने सर्वच शाळांना इ.पहिली पासुनच सीबीएसई पॅटर्न लागु केला आहे.यानिर्णयाने पालकांतुन आनंद व्यक्त होत असुन, या निर्णयाचे स्वागत होत आहे.यामुळे आता पालकांना आपल्या मुलांना इंग्लिश स्कुलमध्ये टाकण्याची अवश्यकता नसुन, जे शिक्षण इंग्लिश स्कुलमध्ये दिले जाते.तेच आता जि.प.व शाळांमध्येही दिले जाणार असल्याने पालकांनी आता इंग्लिश स्कुलचा नाद सोडून आता जि.प.शाळेत आपल्या मुलांना प्रवेश घ्यावा.जेणेकरून यात पालकांच्या तर पैशांची बचत होणारच आहे.शिवाय दर्जेदार शिक्षण मिळणार आहे.त्यामुळे पालकांनी आता इंग्लिश स्कुलचा अट्टाहास न धरता आपल्या हक्काच्या जि.प.शाळेत आपल्या मुलांना पाठवावे.असे आवाहन ही अशोक सोनटक्के यांनी केले.

# आश्रम शाळेतील दत्तात्रय शिंदे यांचा सेवापूर्ती कृतज्ञ सोहळा संपन्न

## माझ्या ज्येष्ठ सहकाऱ्यांच्या कष्टामुळे मी भव्य शैक्षणिक संकुल उभा करू शकलो - दिनेश पवार

गेवराई : प्रतिनिधी गेवराई येथील प्राथमिक माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील ज्येष्ठ शिक्षक दत्तात्रय सखाराम शिंदे नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाले. त्या निमित्ताने त्यांचा कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी आश्रम शाळा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष दिनेश पवार हे तर प्रमुख पाहुणे इतर मागास बहुजन कल्याण विभाग बीडचे सहाय्यक संचालक क्षीरसागर, प्रादेशिक परिवहन बीडचे गणेश विघ्ने, सुशील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुशील पवार, पीएसआय बोडखे साहेब, मानवत येथील आयटीआयचे उपप्राचार्य सोलवणकर साहेब, पाथरी उपनगराध्यक्ष शरद झाडे, अंथरवन पिंपरीचे प्राचार्य खंदारे, मुख्याध्यापक शिंदे सर, गेवराई आश्रम शाळेचे प्राचार्य आर डी पवार, मुख्याध्यापक चव्हाण सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि प्रतिमा पूजन करून झाले. सेवापुर्ती निमित्त श्री शिंदे दत्तात्रय सखाराम यांचा सपत्नीक भव्य दिव्य सत्कार सत्कार करण्यात आला. यावेळी शाल फेटा श्रीफळ सन्मानपत्र व शाळेच्या वतीने ५५ इंची एलईडी टीव्ही सप्रेम भेट देऊन शिंदे सरांना सन्मानित करण्यात आले. शिंदे सरांविषयी भावोद्गार करताना दिनेश पवार साहेब म्हणाले की, सुरुवातीच्या कठीण काळामध्ये मी शाळा सुरू केली तेव्हा शिंदे सर सारखे चांगले सहकारी मला मिळाले, व त्यांच्या अपार कष्टामुळे मी हे फार मोठे शैक्षणिक संकुल उभा करू शकलो अशा अनेक आठवणींना उजाळा देत पवार साहेबांनी शिंदे सरांना पुढील जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. इतर मागासबहुजन विभाग बीडचे संचालक क्षीरसागर बोलताना म्हणाले की, ज्या भव्य स्वरूपात हा कार्यक्रम संपन्न होत आहे. त्याअर्थी शिंदे सर हे एक अलौकिक व्यक्तिमत्व आहे. सुशील पवार बोलताना म्हणाले की, शिंदे सारख्या ज्येष्ठ सहकार्यामुळे आज माझ्या शाळेचे अनेक विद्यार्थी



विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवत आहेत, याचा मला अभिमान आहे. यावेळी शिंदे सरांबद्दल वादे सर, तोंडे सर, माजी विद्यार्थी विजय राठोड, सोलवणकर साहेब, आर डी पवार, चव्हाण सर बी आर राठोड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्कार ला प्रत्युत्तर देताना शिंदे सर यांनी आपल्या प्रदीर्घ भाषणामध्ये शाळेच्या सर्व जुन्या आठवणींना उजाळा दिला. संस्थेने दिलेले संधी आणि संस्थेने टाकलेला विश्वास मी सार्थ करू शकलो याचा मला सार्थ अभिम ान आहे असे भाऊ उद्गार काढले. संस्थेचे अध्यक्ष दिनेश पवार साहेब यांचा उपकार मी कधी विसरणार नाही व स्टाफ ने दिलेला स्नेह कधी विसरणार नाही असे म्हणताना सरांचा कंठ दाटून आला. त्यांनी आपल्या भाषणात अनेक आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रम प्रसंगी सरांच्या सुविद्य पत्नी श्री आशाताई शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले सरांचे सुपुत्र डॉक्टर संदीप शिंदे याचे समयोचित भाषण झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नावडे सर, आभार प्रदर्शन एस पी राठोड सर व बहारदार सूत्रसंचालन श्री काळे सर यांनी केले. यावेळी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिंदे सर यांचा मित्रपरिवार व परिवारातील अनेक मंडळी उपस्थित होते. शेवटी स्नेहभोजनाने कार्यक्रमाचे सांगता झाली.

# जिल्हा वाहतुक शाखेचा वैद्यनाथाच्या नगरीत नियम मोडणाऱ्या वाहनधारकांना दणका

## ९५ केसेस व ६६ हजार रुपयाचा ठोठावला दंड चोरीचे वाहन संभाजीनगर पोलीस स्टेशनला जमा

बीड (प्रतिनिधी)-जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शन आणि जिल्हा वाहतुक शाखेची कटाक्ष नजर यामुळे वाहन चोरी करणाऱ्या आरोपींचे चांगलेच धाबे दणाणले आहे. अशातच परळी वै.येथे वर्षभरापुर्वी चोरीला गेलेले वाहन तपासणीदरम्यान चोरीचे आढळून आल्याने संबंधित आरोपीस वाहनासह पकडून कारवाई करण्यात आली त्यामुळे नागरिकांतून पोलीसांच्या कामांविषयी समाधान व्यक्त केले जात आहे

याबाबत माहिती अशी की, बीड जिल्ह्यात सद्यस्थितीला पोलीस अधिक्षक नवनीत सर यांच्या म ार्गदर्शनाखाली गुन्हेगारांचे कंबरडे मोडले असून यापुर्वी २४ तासाच्या आत गुन्हेगारांवर भारतीय न्याय संहिते अंतर्गत कायदेशीर कारवाई केल्याच्या घटना घडल्याने गुन्हेगारांना चांगलाच वचक बसला आहे त्यामुळे बीड जिल्हा पोलीसांवर जनतेचा विश्वास वाढलेला दिसत आहे अशातच आज रोजी जिल्हा वाहतुक शाखेने मोटार वाहन कायद्या अंतर्गत परळी येथे संभाजीनगर पोलीस स्टेशनच्या अंतर्गत अप्पर पोलीस अधिक्षक सचिन यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष, संभाजीनगरचे पोलीस निरीक्षक धनंजय यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्यासोबत पोलीस हवालदार




शांतीलाल, पोलीस हवालदार विष्णु, पोलीस नाईक आदिनाथ, पोलीस अंमलदार विश्वजित, चालक हवालदार संतोष व संभाजीनगरचे पोलीस अंमलदार दिलीप यांच्या सहकार्याने दुपारी ११ ते १ च्या दरम्यान परळी वै.उड्डाणपुल, एकमिनार चौक येथे विविध कलमांतर्गत लायसन्स नसणे, विमा नसणे, काळी काच, नो पार्किंग, ट्रिपलसीट या सदराखाली एकुण ९५ केसेस व दंड ६६ हजार रुपये करण्यात आला व रोख ६ हजार ८०० रुपये दंड वसुल केला. या दरम्यान पोलीस स्टेशन गंगाखेड गु.र.नं.४५/२४ कलम ३७९ अंतर्गत चोरीस गेलेली मोटारसायकल क्र.एम.एच.२२ बीबी ३२६१ हे वाहन आरोपी नामे शेख मोहम्मद शेख नबीसाब बागवान,रा.वैजवाडी, ता.परळी सह पकडली व पोलीस स्टेशन संभाजीनगर यांच्या स्वाधीन केले.

या हत्याकांडामधील नेमके कारण काय. याचा शोध सिरसाळा पोलीस हे करीत आहेत.

# श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन



गेवराई दि.१ (प्रतिनिधी)शहरातील श्रीराम मंदिर येथे श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात रविवार दि.३० मार्च ते दि.७ एप्रिल दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी श्रीराम भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीराम मंदिर संस्थान व श्रीराम भक्त मंडळी यांच्या वतीने करण्यात आले आहे. प्रभु श्रीरामचंद्र जन्म ोत्सव सोहळ्यानिमित्त श्रीराम मंदिर, गेवराई येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये रविवार दि.३० मार्च २०२५ रोजी रुद्राभिषेक व घटस्थापना, मंगळवार दि.०१ एप्रिल रोजी श्री.डॉ.मुकुंद महाराज मुरलीधर (गोंदीकर) यांचे संगीत भागवत कथा दुपारी १२ ते ०५ पर्यंत व श्री. विष्णु महाराज बांडे (युट्युब स्टार) यांचे भारुड सायं.७:३० वा, बुधवार दि.०२ एप्रिल रोजी कु.सिध्देश्वरी कोकाटे (संगीत

# तेलगावच्या जिजामाता विद्यालयास तृतीय पारितोषिक

किल्ले धारूर दि.१ (वार्ताहर) उत्कृष्ट व सर्व सुविधा असलेल्या शाळा, विद्यालयांसाठी माझी शाळा सुंदर शाळा हा उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमांतर्गत तेलगाव घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय उपक्रमात तेलगाव येथील जिजामाता प्राथमिक विद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला.याबद्दल विद्यालयाचे अध्यक्ष, मुख्याध्यापक, व सर्व शिक्षकांवर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शाळांमधील गुणवत्ता सुधारून शाळांनी विद्यार्थ्यांना मुलभूत भौतिक सुविधा उपलब्ध करून देऊन, दर्जेदार शिक्षण द्यावे.यासाठी शाळा, विद्यालयांनी अग्रेसर राहावे.यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्याकरिता शासनाने माझी शाळा सुंदर शाळा उपक्रम हाती घेत या उपक्रमांतर्गत ज्या शाळा, विद्यालय सहभागी होतील. त्यांना प्रथम, व्दितीय, तृतीय असे पारितोषिक देण्यात येणार आहेत. या उपक्रमात तेलगाव येथील जिजामाता प्राथमिक विद्यालयाने सहभाग घेतला होता.प्रथम तालुकास्तरीय घेण्यात आलेल्या स्पर्धेत जिजामाता विद्यालयाने भाग घेतला होता.यात प्रथम क्रमांक मिळवला होता.त्यानंतर घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात ही या विद्यालयाने सहभाग घेत या स्पर्धेत जिल्ह्यातुन तृतीय क्रमांक पटकावत. तृतीय पारितोषिकाचा मान मिळवला.जिजामाता प्राथमिक विद्यालय हे ग्रामीण भागात शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेले नामांकित विद्यालय असुन, या विद्यालयाने विविध स्पर्धा परीक्षेत ही वेळोवेळी सहभाग घेऊन, त्यातही यश संपादन केलेले आहे.

# नॅचरल डेअरीची गुडीपाडवा व ईद निमीत्त २ लाख ४० हजार दुध विक्रीची ऐतिहासिक कामगिरी

कळंब दि.१ (प्रतिनिधी): यावर्षीचा गुढीपाडवा व ईद हे दोन्ही सण लागोपाठ आल्याने सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी डेअरी विभागांमध्ये अत्यंत उत्कृष्ट कार्य करून दोन्ही सणासाठी संपूर्ण मराठवाडा, विदर्भ कर्नाटक व तेलंगणा या आपल्या नेहमीच्या ग्राहकांच्या सेवेमध्ये अत्यंत तत्परतेने व विना अडथळा दुधाचा मागणीप्रमाणे पुरवठा करून मागील सर्व रेकॉर्ड मोडून दोन लाख ४० हजार लिटर दुधाचा पुरवठा या दोन्ही सणासाठी केल्याबद्दल नॅचरल डेअरीचे सर्व अधिकारी व कर्मचा-यांचे नॅचरल परिवाराच्या वतीने बी. बी. ठोंबरे यांनी हार्दिक अभिनंदन केले! दोन्ही सणाच्या नियोजनामध्ये डे अरी प्रकल्पाचे प्रमुख, दूध प्रक्रिया विभागाचे प्रमुख , बाय प्रॉडक्ट विभागाचे प्रमुख , सर्व टीओ , टाईम ऑफिसचे प्रमुख , सर्व कायम , हंगामी , डेली वेजेस , कॅज्युअल कर्मचारी तसेच दूध संकलनाचे प्रमुख, सर्व रूट सुपरवायझर , मार्केटिंगचे प्रमुख , सुपरवायझर्स , तसेच दूध संकलन करणारे दूध संकलक, दूध संकलन वाहतूकदार, दूध विक्री करणारे सर्व डीलर्स, सब डीलर्स , रिटेलर्स , दूध वाहतूक करणारे सर्व वाहतूक ठेकेदार आणि प्रामुख्याने नॅचरलचे सर्व दूध उत्पादक शेतकरी बंधू आणि नॅचरल डेअरीचा मोठा ग्राहक वर्ग, या सर्वांचे बी.बी.ठोंबरे यांनी मनापासून आभार व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले.

# जिल्ह्यात विजेच्या कडकडाटासह पाऊस व वादळी वारे वाहण्याची शक्यता नागरिकांनी सावधगिरी बाळगावी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार २ व ३ एप्रिल २०२५ हे दोन दिवसासाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. या दोन दिवसांच्या काळात जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका व मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा व नागरिकांनी काळजी घ्यावी असे, आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने केले आहे.

या गोष्टी करा: - विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्याने बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इम ारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

या गोष्टी करु नका :- आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका.उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनो-याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे.

व नियोजनबद्ध हा सर्व कार्यक्रम पार पाडला, या फार्मसी कॉलेजमध्ये अभ्यासाबरोबरच इतर ही कार्यक्रम घेतले जातात त्यामुळे विद्यार्थ्यांना इतर कलागुण दाखवता येतात व अशा वेगवेगळ्या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना जीवनामध्ये उपयोग होतो विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये चांगले यश मिळते व सामाजिक बांधिलकी ही विद्यार्थ्यांना यामधून समजते, यामुळे या कॉलेजमध्ये सर्व प्रकारचे कार्यक्रम घेतले जातात असे कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुनील कोल्हे यांनी सांगितले .

# व्हॉईस ऑफ मीडियाच्या तालुकाध्यक्ष, कार्याध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर

प्रतिनिधी | बीड

दि.१ : व्हॉईस ऑफ मीडियाकडून बीड जिल्ह्यातील विविध तालुकाध्यक्ष आणि तालुका कार्याध्यक्षांच्या निवडी जिल्हाध्यक्ष जालींदर धांडे यांच्याकडून आज एक एप्रिल रोजी जाहीर करण्यात आल्या. यामध्ये गेवराईचे तालुकाध्यक्ष म्हणून विनोद पौळ, कार्याध्यक्ष म्हणून राजेश राजगुरू, म ाजलगावचे तालुकाध्यक्ष वैजेनाथ घायतिडक तर कार्याध्यक्ष म्हणून गणेश काटकर, परळीचे तालुकाध्यक्ष महादेव शिंदे तर कार्याध्यक्ष श्रीराम लांडगे, बीडचे तालुकाध्यक्ष अशोक शिंदे तर कार्याध्यक्ष सुरेश रोकडे, शिरूर तालुकाध्यक्ष अशोक शिंदे, तर कार्याध्यक्ष राजेश्वर क्षीरसागराळे, आष्टी तालुकाध्यक्ष अनिरूध्द धर्माधिकारी तर कार्याध्यक्ष भाऊसाहेब गाडे, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष म्हणून अतुल जाधव तर कार्याध्यक्ष म्हणून देवीदास जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नवनिर्वाचित सर्व तालुकाध्यक्ष व कार्याध्यक्षांच्या नियुक्तीबद्दल जालींदर धांडे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# टेम्पोची मोटारसायकलला जोराची धडक एक ठार - एक गंभीर जखमी नागबर्डी शिवारातील घटना

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-लोहा : मोटारसायकल वर पत्नीला घेऊन सासरवाडीला जात असताना भरधाव वेगातील पिकअप टेम्पोने समोरील मोटारसायकलला जोराची धडक दिल्याने या अपघातात पती ठार तर पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना दि.१-एप्रिल रोजी मंगळवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास मारतळा ते हळदा मार्गावरील नागबर्डी शिवारात घडली दरम्यान जखमी पत्नीवर नांदेड येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. लोहा तालुक्यातील जोमेगाव येथील शेतकरी मोहन रामजी शिंदे वय ५५ वर्ष व पत्नी कान्होपात्राबाई मोहन शिंदे वय ५० वर्ष हे दोघेजण स्वतःची मोटारसायकल क्र.एम एच २६ सी.जी.९९३८ वरून कंधार तालुक्यातील चिखली या सासरवाडी गावी जात असताना हळदा कडून मारतळा कडे भरधाव वेगाने जाणाऱ्या पिकअप



अशोक लेलँड टेम्पो क्र. एम एच १३ एच ८३९४ या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालवून समोरील मोटारसायकलला जोराची धडक दिली. या अपघातात मोहन रामजी शिंदे हे जागीच ठार तर त्यांच्या पत्नी कान्होपात्राबाई मोहन शिंदे या गंभीर जखमी झाल्यामुळे १०८ रुग्णवाहिकेतून पती व पत्नीस नांदेडला हलविले. जखमी पत्नीवर नांदेड येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्या गंभीर जखमी आहेत. तर मयत मोहन शिंदे यांच्या मृतदेहाची उत्तरीय तपासणीसाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले.मयत मोहन शिंदे यांच्या पश्चात पत्नी दोन विवाहित मुली, असा परिवार आहे. शांत संयमी व अतिशय कष्टाने शेती करणाऱ्या या शेतकऱ्याच्या अपघाती निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. बातमी लिही पर्यंत या प्रकरणी उस्माननगर पोलीस ठाण्यात टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुनील सूर्यवंशी हे करीत आहेत.

# बीड जिल्ह्यातील ब्रम्हनाथ येळंब कोल्हापूर पद्धतीच्या बंधा-यांचे बॅरेजमध्ये रुपांतरणास मान्यता

## बीडमधील टाकळगांव हिंगणी कोल्हापूर पदूधतीच्या बंधा-यांच्या बॅरेजमध्ये रुपांतरणास मान्यता

बीड जिल्ह्यातील टाकळगाव हिंगणी कोह्लापूर पध्दतीच्या बंधारे प्रकल्पाचे बॅरेजमध्ये रुपांतरणास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवर सुमारे 30 ते 35 वर्षापूर्वी बांधलेला टाकळगांव हिंगणी कोह्लापूर पद्धतीचा बंधारा नादुरुस्त झाला आहे. यामुळे सदर बंधा-याचे रुपांतरण बॅरेजमध्ये करण्यास शासनाने ऑक्टोबर, २०२१ मध्ये तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने पुरेसा पाणीसाठा व मोठ्या क्षेत्रास सिंचन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तसेच पूरनियंत्रणा करिता या टाकळगांव हिंगणी कोह्लापूर पद्धतीच्या बंधा-याचे बॅरेजमध्ये रुपांतरण करण्यात येणार आहे. या कामाच्या १९ कोटी ६६ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

## बीड जिल्ह्यामधील निमगांव बंधा-याचे बॅरेजमध्ये रुपांतरणास मान्यता

बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील निमगांव कोह्लापूर पद्धतीच्या बंधा-यांचे बॅरेजमध्ये रुपांतरण करण्याच्या कामास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील निमगांव कोह्लापूर पद्धतीचा बंधारा नादुरुस्त आहे. या बंधा-याचे बॅरेजमध्ये करण्यास रुपांतरणास २०२२ मध्ये मध्ये तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्यामुळे या बॅरेजच्या रुपांतरणास व त्यासाठीच्या २२ कोटी ८ लाख रुपयांच्या कामांना आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील ब्रम्हनाथ येळंब कोह्लापूर पध्दतीच्या बंधारे प्रकल्पाचे बॅरेजमध्ये रुपांतरीत करण्याच्या कामास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवर सुमारे 30 ते 35 वर्षापूर्वी बांधलेले ब्रम्हनाथ येळंब कोह्लापूर पद्धतीचा बंधारा नादुरुस्त होता . पूर परिस्थितीत सदर कोह्लापूर पद्धतीचे बंधा-याचे गेट्स काढणे जिकिरीचे होत असल्याने पूर नियंत्रण करताना अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर सदर कोह्लापूर पद्धतीच्या बंधा-याचे रुपांतरण बॅरेजमध्ये करण्यास शासनाने मे 2022 मध्ये तत्वत: मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने प्रकल्पीय पाणीसाठा व प्रकल्पीय सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित करण्याच्या दृष्टीने व सुलभ पूरनियंत्रणा करिता उभ्या उचल पद्ध्तीची द्वारे बसविण्याच्या दृष्टीने ब्रम्हनाथ येळंब कोह्लापूर पद्धतीच्या बंधा-याचे बॅरेजमध्ये रुपांतरण करण्याच्या कामाच्या एकूण 17.30 कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास विस्तार व सुधारणा अंतर्गत काही अटी व शर्तीसह प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव प्रसंगी चला जाणुया नदीला अभियान अंतर्गत बोबाटी नदी संवाद यात्रा

केज दि.१ (प्रतिनिधी):वरपगाव, ता. केज येथे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव प्रसंगी चला जाणुया नदीला अभियान अंतर्गत बोबाटी नदी संवाद यात्रा समारोप सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. ही नदी संवाद यात्रा दिनांक २८ मार्च २०२५ रोजी सुरू झाली होती. यात्रेने विडा पिंपळ गव्हाण, काळेगाव, अरणगाव, बेलगाव, जाधव जवळा, मस्साजोग, उ. पिंपरी, कापरेवाडी, केवड, हदगाव, डोका, सारूकवाडी व वरपगाव अशा गावांमध्ये जनजागृती केली. यात्रेच्या समारोप प्रसंगी वरपगावचे जेष्ठ नागरिक अण्णासाहेब देशमुख, राज्य स्तरीय सदस्य अनिकेत लोहिया, रमाकांत बापू कुलकर्णी, सेवा निवृत्त अभियंता एच. ए. देशमुख, जल संधारण विभागाचे राहुल होरे, वन विभाग धारूरच्या श्रीमती टी. आर. अरखाडे, सामाजिक कार्यकर्ता निलकंट नाईकवाडे, युवा ग्रामचे कार्यकारी सचिव एच. पी. देशमुख व इतर मान्यवर उपस्थित होते. या यात्रेच्या सर्वेक्षण व अभ्यासाचा आढावा मा. एच. देशमुख यांनी सर्वांसमोर सादर केला. त्यांनी बोबाटी नदी पुनर्जीवनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणार असल्याचे सांगितले. तसेच नदीवरील प्रस्तावित बंधाऱ्यांविषयी व त्यांच्या पाठपुराव्याबाबत माहिती दिली. मा. रमाकांत बापू कुलकर्णी यांनी पाण्याचे ताळेबंद समजावून सांगितले, तर मा. अनिकेत लोहिया यांनी युवा ग्राम व विविध भागीदारीतून नदी पुनर्जीवनासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला. मानवलोक संस्थेने देखील या कार्यास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या चार दिवसीय यात्रेत सुधाकर देशमुख यांच्या जनजागृती गीतांनी लोकप्रबोधन करण्यात आले. तसेच संजय शिंदे व इतर मान्यवरांनी पर्यावरण समतोल व नदी पुनर्जीवनाच्या उपाययोजनांवर मार्गदर्शन केले.


## धार्मिक स्थळांना विशेष संरक्षण द्या

धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) महाराष्ट्रामध्ये धार्मिक स्थळांवर होणाऱ्या हल्लयांच्या घटनामध्ये वाढ होत आहे. बीड जिल्ह्यातील अर्धमसला गावात मशिदीमध्ये जिलेटीनचा स्फोट घडवून आणल्याच्या घटनेचा निषेध करत महाराष्ट्रातील धार्मिक स्थळांना विशेष संरक्षण द्यावे अशी मागणी मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत मंगळवारी (दि.१) मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले. निवेदनात म्हटले की, गेल्या अनेक महिन्यापासून महाराष्ट्र ामध्ये अल्पसंख्यांक मुस्लिम समाजाला लक्ष्य करुन तसेच समाजाप्रति द्वेषाचे वक्तव्य करुन समाजात विष कालवण्याचा प्रयत्न सुरु आहे. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांचा सुद्धा यामध्ये सहभाग आहे. ही बाब निंदणीय असून त्याचा मुस्लिम समाज निषेध करत आहे. त्याचीच परिणिती म्हणून काही जातीयवादी व्यक्तींनी बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील अर्धमसला गावात मशिदीमध्ये स्फोट घडवून आणला. तसेच जालना येथे दर्ग्याची तोडफोड, दर्ग्यावर विशिष्ट झेंडे लावणे, समाजाबद्दल अपशब्द वापरणे असे प्रकार घडत आहेत. या घटना निषेधार्ह असून मुस्लिम समाजाच्या सहनशीलतेच्या पलिकडची बाब आहे. ज्या प्रकारे नागपूर येथील दंगलखोरांवर देशद्रोहासारखा गंभीर गुन्हा दाखल करुन त्यांची घरे बुलडोजरने पाडली, तशीच कारवाई बीड व जालना जिल्ह्यातील समाजकंटकांवर करण्यात यावी, समाजामध्ये विष पेरण्याचे काम करणाऱ्यांवर देखील कठोर कारवाई करावी, जेणेकरुन महाराष्ट्रात जातीय शांतता व सलोखा निर्माण राहील, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर मसूद शेख, ॲड. परवेज काझी, कादरखान पठाण, वाजीद पठाण, आयाज शेख, एजाज काझी, ॲड. फेरोज शेख, तौफिक पठाण, अन्वर शेख, खलील पठाण, इरशादअली सय्यद, अफरोज पीरजादे, इस्माईल काझी, बाबा मुजावर, रउल्ला शेख, इम्रान खान, ॲड. जावेद काझी, साबेर सय्यद, अतिक शेख, तौफिक शेख, अल्ताफ शेख, हसीब काझी, बिलाल तांबोळी, महेमूद मुजावर, खलील शेख, इब्राहीम शेख, इस्माईल शेख व इतर समाजबांधवांची स्वाक्षरी आह

# कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी स्वत:चीच दुकाने थाटली ?

आष्टी (प्रतिनिधी) महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागातील काही अधिकारी कर्मचाऱ्यांनी बेकायदेशीरपणे नातेवाईक आणि मित्रांच्या नावे कृषी निविष्ठा उत्पादक कंपन्या आणि विक्री केंद्र सुरू केली असून या जबाबदार अधिकाऱ्यांची माहिती आपण मागितली असून या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याची मागणी करणार आहोत अधिकाऱ्यांनी स्वतःच्याच कंपन्या स्थापन करून निकृष्ट दर्जाच्या निमित्त शेतकऱ्यांच्या माती मारल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होऊन शेतकऱ्यांना संकटाला सामोरे जावे लागल्यामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आली मात्र अधिकारी मालामाल होण्यासाठी प्रयत्न करत आहेत हे महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी आहे त्यामुळे या सर्व अधिकाऱ्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची आपण मागणी करणार आहोत असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथील विशेष पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. ते पुढे म्हणाले,महाराष्ट्रील कृषि क्षेत्र वरचेवर संकटात असल्याने महाराष्ट्रील शेतकरी आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होत आहे. शेतकरी आत्महत्या करण्याच्या पाठीमागे निकृष्ठ दर्जाची खते, बियाणे, औषधे आणि किटकनाशाके, सूक्ष्म मुलद्रव्ये, प्रजैवके (झत्रह्र), झठजच् इत्यादीचा पुरवठा कंपन्या

व कृषि विभागातील अधिकारी शेतकऱ्यांच्या माथी मारत आहेत. तसेच कंपन्या निरनिराळे प्रलोभने देऊन शेतकऱ्यांना मुख्य खते (युरीया, डीएपी इत्यादी) सोबत लिंकिंग मध्ये ही निकृष्ठ दर्जाची खते घेण्यास भाग पडत आहेत. त्यासाठी गाव पातळीवरील कृषि निविष्ठा विक्री केंद्रे व कंपनी पातळीवरील विक्री काम पाहणारे किंवा उत्पादन केलेला माल खपविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत आणि शेतकरी कर्ज काढून उत्पन्न जास्त यईल या आशेने या निविष्ठा घेत आहेत, गेल्या १० वर्षा पासून चढत्या क्रमाने बोगस खते, बियाणे, औषधे उत्पदान करणाऱ्या कंपन्यांचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाचा उत्पादन खर्च वाढत आहे. हवामान व पावसाचे अनिश्चिततेमुळे अपेक्षित उत्पादन शेतीमधून मिळत नाही उत्पन्न आल्यानंतर त्याचा बाजारात योग्य भाव मिळत नाही, त्यामुळे शेतकरी आत्महत्याचे प्रमाण महाराष्ट्रामध्ये वाढू लागलेले आहे ही एक वस्तुस्थिती आहे. निकृष्ट दर्जाच्या या खते बियाणे औषधे आणि निविष्ठा उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर योग्य दर्जा आणि गुणवत्ता पूर्ण निविष्ठा उत्पादन होणार आहे याचे नियंत्रण करण्याचे मुख्य काम कृषी विभागाचे आहे. एका जिल्ह्यामध्ये कृषी विभागामार्फत



गुणनियंत्रणाच्या कामासाठी प्रत्येक तालुक्याला कार्यरत असणारे तालुका कृषी अधिकारी, पंचायत समिती मधील कृषी अधिकारी, उपविभागीय पातळीवर उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा पातळीवर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जिल्ह्यात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयातील कृषी उपसंचालक व पूर्णवेळ जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, जिल्हा परिषदेकडील कृषी विकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेकडील मोहीम अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, विभागीय तंत्र अधिकारी गुन नियंत्रण इत्यादी अधिकारी कर्मचारी काम करीत आहेत. साधारणपणे आमच्या बीड जिल्ह्यामध्ये एकूण ११ तालुके आहेत. त्यामध्ये ११ तालुका कृषी अधिकारी, ११ पंचायत समितीचे कृषी अधिकारी, ३ उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा परिषदेचे मोहीम अधिकारी, कृषी विकास अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, त्यांच्या कार्यालयातील कृषी उपसंचालक आणि पूर्णवेळ जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक असे मिळून

सुमारे ३० एकट्या बीड जिल्ह्यात क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर म्हणून कार्यरत आहेत. विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील तंत्र अधिकारी गुणनियंत्रण, विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक हे सुद्धा क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर आहेत. या सर्वांनी बदली करीता मंत्री कार्यालयात मोठ्या प्रमाणात रकमा देऊन बदली करून घेतली

## माहेश्वरी प्रगती मंडळाचा स्तुत्य उपक्रम :रखरखत्या उन्हाच्या चाहूलात बीड बस स्थानकात शीतल जलपेयची व्यवस्था

बीड ।प्रतिनिधी माहेश्वरी प्रगती मंडळ बीडच्या वतीने मागील तीन दशकापासून बीड शहरात अनेक समाज उपयोगी सामाजिक, धार्मिक, वैद्यकीय, शैक्षणिक, पर्यावरणपूरक व सांस्कृतिक कार्य चालू असून मागील अनेक वर्षापासून ग्लोबल वार्मिंगमुळे आपल्याकडे उन्हाची दाहकता वाढत आहे. यावर्षी मार्च महिन्यातच उष्णतेचे चटके बसण्यास सुरुवात झाली असून तापमान ४२ अंश सेल्सिअसपर्यंत गेले आहे. बीड बस स्थानकात दररोज हजारो प्रवासी उन्हाची लाही लाही सहन करीत प्रवास करीत असतात. बस स्थानकात व स्थानकापासून जवळपास ४० किलोमीटर अंतरापर्यंत मोफत व शुद्ध जल पेयाची व्यवस्था नाही तसेच मोजकेच प्रवासी बाटलीचे पाणी पिऊ शकतात त्यामुळे बसस्थानकातील अनेक प्रवाशांनी व व्यवस्थापन समितीने मोफत शितल ,शुद्ध जलपेयाची व्यवस्था करण्याचे आवाहन केले. तद्नुसार मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही रविवार दि.३० मार्च २०२५ रोजी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर अत्यंत सुसज्ज असलेली शुद्ध, थंड शीतल व मोफत पेयजल पिण्याच्या पाण्याची व्यवस्था माहेश्वरी प्रगती मंडळाद्वारे करण्यात आली. बीड बस स्थानकातील मोफत पानपोईचे उद्घाटन मा.श्री. दिलीपजी धूत (मा. संचालक ,महाराष्ट्र पर्यटन मंडळ, मुंबई), संपादक श्री. दिलीपजी खिस्ती (दैनिक लोकप्रश्न), सौ. अनुजाताई दुसाने (विभागीय नियंत्रक बीड), श्री संतोषजी डोके (आगार प्रमुख) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी माहेश्वरी प्रगती मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र कासट, सचिव जुगलकिशोर बियाणी, ज्येष्ठ सदस्य सी.ए. सुरेशजी लड्डा, संपर्कप्रमुख विष्णुदास बियाणी, सि.ए. गोपाल कासट, सुरज लाहोटी, उपाध्यक्ष संतोष टवाणी, बाळकिसन बियाणी यांनी मंडळाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. सर्व प्रमुख अतिथी मान्यवर व मंडळाचे सर्व सदस्यासमवेत फीत कापून व श्रीफळ वाढवून यथोचित मोफत पाणपोईचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी मंडळाच्या उपक्रमाबद्दल अत्यंत प्रशंसोदगार काढून प्रवाशांना जलसेवा देण्याचे पुण्य कर्म करीत असल्याबद्दल आभार व्यक्त केले व भविष्यात ही पुण्यसेवा करण्याचे आवाहन केले. तद्नंतर मंडळातर्फे नवीन होणाऱ्या नियोजित बस स्थानकात शुद्ध व शितल जल आर.ओ. फिल्टर बसवणे जे बाराही महिने सेवा देण्याचे मंडळाच्या वतीने विभाग नियंत्रक यांना आश्वासित करण्यात आले. विभाग नियंत्रकांनी केलेल्या आवाहनानुसार शितल पेयजल सेवेबरोबरच प्रवाशांना थंडगार पाणी बसून पिण्यासाठी व प्रवाशांसाठी बैठक व्यवस्था असणे आवश्यक आहे म्हणून मंडळातील मा अध्यक्ष श्री. विष्णुदास बियाणी यांनी चंपावतीरत्न स्व. विठ्ठलदासजी बियाणी यांच्या स्मरणार्थ, डॉ. राजेंद्र सारडा यांनी स्व. मिठ्ठूलालजी सारडा यांच्या स्मरणार्थ, मा.अधयक्ष सि.ए. गोपाल कासट यांनी स्व. बंकटलालजी कासट यांच्या स्मरणार्थ व मंडळाचे माजी अध्यक्ष स्व. प्रमोद मणियार यांच्या पुण्यस्मरणार्थ आकर्षक अशी आसन व्यवस्था तात्काळ बीड बस स्थानकात उपलब्ध करून दिली. या कार्यक्रमास मंडळाचे सहसचिव राजेंद्र चरखा, ॅड. ओमप्रकाश लोहिया, बालाप्रसाद जाजू, गंगाबिशन करवा, डॉ. राजेंद्र सारडा, बद्रीनारायण मानधने, इंजि. दगडूलाल बंग, डॉ. सुरेंद्र बजाज, भागीरथ चरखा, इंजि. जगदीश मंत्री, ईश्वर चरखा, राजेश मु ंदडा, ॅड. विजय कासट, विष्णुदास तापडिया आदि माहेश्वरी प्रगती मंडळाचे पदाधिकारी ,सदस्यांसह बीड बस स्थानकातील अधिकारी, कर्मचारी, परिसरातील व्यापारी बांधव, महिला- पुरुष प्रवाशांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष सुरेंद्र कासट यांनी केले तर सूत्रसंचालन अमर डागा यांनी तसेच आभार प्रदर्शन गोपाल कासट यांनी केले.

## लक्ष्मीकांत सौन्दत्तीकर यांची संस्कार भारतीच्या अध्यक्षपदी निवड

बीड ।प्रतिनिधी सा कला या विमुक्तये हा मुलमंत्र घेऊन कला, क्रीडा, संस्कार, संस्कृती, इतिहास या विषयात कार्य करणाऱ्या संस्कार भारती या संस्थेच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी जेष्ठ रंगकर्मी लक्ष्मीकांत उर्फ बाळू सौन्दत्तीकर यांची निवड झाली आहे. आगामी काळात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याचा मानस नूतन जिल्हाध्यक्ष सौन्दत्तीकर यांनी व्यक्त केला आहे. संस्कार भारती देवगिरी प्रांताची नुकतीच एक बैठक संपन्न झाली. गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे बीड जिल्ह्यात मिळेल ती जबाबदारी पार पाडणारे लक्ष्मीकांत सौन्दत्तीकर यांच्याकडे जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्याचा निर्णय एकमुखाने झाला.संस्कार भारती बीड जिल्हा कार्यकारिणी पुढीलप्रमाणे संरक्षक -वासुदेव व्यंकटराव निलंगेकर, मार्गदर्शक - कुलदीप रेणुकादास धुमाळे अध्यक्ष -लक्ष्मीकांत नारायणराव सौंदत्तीकर,उपाध्यक्ष -श्रीमती प्रज्ञाताई भरतबुवा रामदासी,सुरेश चंद्रभान साळु ंके,गणेश यशवंतराव तालखेडकर,सौ मधुरा मिलिंद बाभुळगावकर सचिव -सुरेश देविदासराव भानप,सहसचिव -अनिल रत्नाकरराव कुलकर्णी,गणेश बबनराव स्वामी,कोषप्रमुख-संतोष शामसुंदर पारगावकर,सहकोषप्रमुख- दत्तात्रय केशवराव घोडके,महेश रामराव देशमुख मंचीय कला संयोजक -प्रा. डॉ. राहुल श्रीपादराव पांडव नृत्य -सौ. अनुराधा श्रीपाद चिंचोलकर संगीत -प्रकाश प्रभाकरराव मानुरकर, नामदेव हरीभाऊ साळुंके,रत्नदिप त्रिंबकअप्पा शिगे,शैलेश पुराणिक, दृश्य कला संयोजक - केदारनाथ मारोती बहिरमल,भू अलंकरण -सौ.संगीता संदिकर साहित्य विधा संयोजक -प्रा.डी. एस. कुलकर्णी, साहित्य विधा सहसंयोजक प्रा लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर,प्राचीन कला संयोजक, प्रा. जोगेंद्र रामराव गायकवाड,प्रचार व प्रसिद्धी प्रमुख दिनेश लिंबेकर कार्यकारणी सदस्य,जगदीश हरिभाऊ पिंगळे,ड.श्री.श्रीराम देशपांडे.

## सी. बी. एस. ई माध्यमाची गुढी उभारुन राजस्थानी शाळेत इ. 1 लीची नवीन बॅच सुरु

बीड ।प्रतिनिधी सतत नाविन्याचा ध्यास घेऊन कार्य करणाऱ्या सन १९६६ पासून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून हजारो विद्यार्थ्यांचे उज्जवल भविष्य घडवणाऱ्या मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात आज नवीन शैक्षणिक धोरणानुसार सि. बी. एस. ई माध्यमाची इ.१ ली वर्गाची सुरुवात करण्यात आली. आकर्षक सजावट , नयनरम्य रांगोळी , सि. बी. एस. ई. ची गुढी , सेल्फी पॉईंट,मुलांना गिफ्ट विद्यार्थ्यांचे स्वागत या सर्व तयारीसह नव्या बॅचचे स्वागत करण्यात आले.राजस्थानी सेवा समाज या संस्थेचे अध्यक्ष विष्णुदास तापडिया, सचिव रामेश्वर कासट यांच्या विशेष उपस्थितीत तसेच माध्यमिक विभागाचे प्राचार्य कसबे सर , उपमुख्याध्यापक लाहोटी सर , पर्यवेक्षक हावळे सर यांच्या उपस्थितीत सरस्वती पूजन करून विद्यार्थ्यांचे टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. मुलांना पेन्सील, इरेझर गुलाबाचे फुल भेट स्वरूपात देण्यात आले.मुलांनी व पालकांनी स्वागत सोहळ्याचा मनापासून स्वीकार करत सेल्फी व फोटोजचा ही आनंद घेतला. शाळेचे मुख्याध्यापक गिरीश सोहनी यांच्या मार्गदर्शनात तोष्णीवाल , गांधी , लड्डा , बोरा , दोडे , उबाळे ,मंत्री

## नववर्षाच्या स्वागताला संस्कार भारतीने उलगडला पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा जीवनपट

अठ्ठावीस वर्षाची परंपरा लाभलेल्या कनकालेश्वर महोत्सवात यंदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावरील कुलदीप धुमाळे लिखित कतृ ‍त्वशालिनी राजयोगिनी पुण्यश्लोक अहिल्या ही नाटिका सादर करण्यात आली. तर विख्यात पखवाजवादक कृष्णा सोळंके यांनी पखावजवर शिवतांडव हे विविध तालांचे अनोखे वादन सादर केले. लोककलावंत बबनमहाराज घुगे यांनी गवळणी सादर केल्या.तर साई




नृत्यालयाच्या विद्यार्थिनींनी तरंगत्या रंगमंचावर भरत नाट्यम सादर केले. प्रारंभी कनकालेश्वर महोत्सवाचे उद्घाटन युवा नेते योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते आणि पश्चिम क्षेत्र प्रमुख चंद्रकांत घरोटे, भरत लोळगे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि स्नेहल पाठक यांच्या अध्यक्षेतेखाली दीप प्रज्वलित करून करण्यात आले ,यावेळी संस्कार भारतीचे माजी महामंत्री कुलदीप धुमाळे यांचा अमृत महोत्सवी सत्कार करण्यात आला.व्यासपीठावर प्रमोद वझे,महेश वाघमारे, डॉ. विद्यासागर पाटांगणकर,सतीश महामुनी ,शेषनाथ वाघ उपस्थित होते. प्रास्ताविक प्रांत मंत्री प्रमोद वझे यांनी केले. यावेळी संस्कार भारती, बीडच्या दिनदर्शिकेचे आणि दैनंदिनीचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.यावेळी योगेश क्षीरसागर यांनी आगामी काळात हा मोहोत्सव अधिक भव्यदिव्य पध्दतीने साजरा करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे वचन दिले तर कुलदीप धुमाळे यांनी सत्काराला उत्तर देतांना आपण संस्कार भारतीमुळे घडलो अशी कृतज्ञता व्यक्त केली. संस्कार भारती बीड शाखेच्या वतीने गेल्या २८ वर्षांपासून कनकालेश्वर महोत्सव साजरा केला जातो चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात पाडव्याच्या दिवशी मराठी नववर्षाचे स्वागत आगळ्यावेगळ्या पद्धतीने कंकालेश्वर मंदिराच्या जलाशयासमोर उपस्थित नागरिकांनी कनकालेश्वरावर पुष्पवृष्टी करून नववर्षाचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात नृत्यगुरू अनुराधा चिंचोलकर यांच्या साई नृत्यालयाच्या विद्यार्थिनींच्या तरंगत्या रंगमंचावरील भरत नाट्यमने झाली

# वक्फ बोर्डाची संपत्ती तुमच्या पप्पाची जहागीर नाही, काय म्हणाले की इम्तियाज जलील

रमजान ईदच्या एक दिवस आधी बीडमधील एका मशिदीत स्फोट झाल्याची धक्कादायक घटना घडली होती.यावर आता एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी भाष्य केले आहे. ते म्हणाले की या मस्जिद स्फोटात बीड पोलिसांनी जी कारवाई केली आहे, त्यावर मी सुरुवातीला समाधानी होतो. परंतू पोलिसांनी एफआयआरमध्ये जी कलमे लावली आहेत त्यावर आपण समाधानी नाही असे त्यांनी म्हटले आहे.

इम्तियाज जलील पुढे म्हणाले



की पोलिसांनी युएपीएनुसार गुन्हा दाखल केला आहे, त्यावर मी मात्र समाधानी नाही, त्या संदर्भात आधीही बोललो आहे, ज्या पध्दतीने स्फोट करणाऱ्यांनी सिगरेट पीत आणि इंस्टा रील्स करत मजिदमध्ये स्फोट घडवला. त्यावरून असे दिसते की त्यांना पोलीस आणि सरकारची भीती राहिलेली नाही. उत्तरप्रदेशामध्ये जे गुंडाराज सुरू आहे,ते गुंडाराज महाराष्ट्रामध्ये दिसता कामा नये, महाराष्ट्राची वेगळी एक संस्कृती आहे आणि महाराष्ट्राला शांती हवी आहे आणि आशा प्रकारच्या लोकांवर कारवाई केली पाहिजे अशी मागणी इम्तियाज जलील यांनी केली आहे. औरंगजेबची कबर लोकांनी जाऊन बघावी इतिहास कसाही असुद्या पण या देशावर औरंगजेबने राज्य केलेले आहे आणि औरंगजेबचा मोठा कार्यकाळ होता. आणि औरंगजेब जेव्हा मारणार होता तेव्हा त्याने साधी कबर असावी आणि त्या काळात तो राजा असतानाही आणि त्यांनी सांगितले होते की माझी कबर खुप मोठी, चांगली आणि सोन्याची करा असे म्हटले नाही,त्यामुळे त्यांच्या इच्छेप्रमाणे ती साधी कबर आहे.राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात जो मुद्दा सांगितला आहे, ती कबर काढू नये, तिथेच ठेवावी आणि इतिहास काय होता ते लोकांना कळू द्यावा ते योग्य आहे. ज्यांना पाहायची आहे ते लोक पाहातील आणि जे लोक धर्माच्या नावाखाली कबर उखडून टाकण्याची भाषा बोलतात, हे सर्व लोक छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेऊन घाणेरडे राजकारण करीत असतात.

### वक्फ बोर्डावर इतर समाजाचे लोक येणार तर...

सरकारकडे आकडे आहेत आणि म्हणूनच आणि वक्फ बोर्डाच्या या बिलाला चंद्रबाबू नायडू, नितेश कुमार आणि अजित पवार यांनी या बिलाला उघड सपोर्ट केलेला आहे. आम्ही त्या बिलाला विरोध केलेला आहे आणि वक्त बोर्डाची जी संपत्ती आहे.ती मुस्लिम समाजाची संपत्ती आहे. मुस्लिम समाजाने दान केलेली ही सर्व मालमत्ता आहे. ही काही तुमची जहागीर नाही. म्हणजे माझ्या भाषेत बोललो तरी पप्पाची जागीर नाही. बोर्डावर तुमचे लोक येत असतील तर इतर जाती धर्माचे जे बोर्ड आहेत त्यांच्यातही आमचे लोक टाका अशी मागणी जलील यांनी केली आहे.


This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com